**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**
**17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-1**
**Web-www.jdhepune.in E-mail:jdhepune@gmail.com**
फोन नं. 020-26127833, 26051632, फॅक्स नं. 020-26127833

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/2025/ई2107162 दि. 26-08-2025

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वायत्त
कला वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य, व शारिरीक शिक्षणशास्त्र
महाविद्यालये, **पुणे जिल्हा.**

**विषय:- पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयात आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे बाबत..**

संदर्भ:1. मा. निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र/सेतू/546 /2025ENo. दि. 20-08-2025
2. सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-1724/ प्र. क्र.45/मावतं / दि.20-08-2025

उपरोक्त संदर्भिय मा. निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील दि. 20-08-2025 रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या CSC 2.0 योजनेतंर्गत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणे बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेत आलेल्या असून, सदर आपले सरकार सेवा केंद्राचे स्थापन, संनियंत्रण व प्रशासकीय नियंत्रण मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविले आहे. सदर शासन निर्णयात नमूद केलेनुसार ज्या महाविद्यालयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे बाबतची मागणी करण्यात येईल, त्या महाविद्यालयांना सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि. 19-01-2018 रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करणेस मान्यता देणेत आली आहे.

त्याअनुषंगाने पुणे जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की,

आपल्या महाविद्यालयामध्ये आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणेसाठी **मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे मार्गदर्शनपर कार्यशाळा हॉल नंबर-03, बि-विंग, चौथा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे दि. 29-08-2025 रोजी दुपारी 03.00 वाजता आयोजित करण्यात येणार आहे.** या कार्यशाळेस दिलेल्या सुचनेनुसार महाविद्यालयातील इतर प्रतिनिधीना उपस्थित राहता येणार नाही. तर निर्णय घेण्यास सक्षम अधिकारी असलेले महाविद्यालयातील स्वत: प्राचार्या/प्रंबधक यांनी उपस्थित राहावे.

**सोबत :** संदर्भिय पत्र.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 26-08-2025
17:21:51

**(डॉ.अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

**प्रत** : मा. निवासी उपजिल्हाधिकारी, (सर्वसाधारण शाखा), बी. विंग, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे स्टेशन, पुणे-01

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे.
(सर्वसाधारण शाखा)
बी विंग, तिसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे स्टेशन, पुणे-४११००१.

| दुरध्वनी क्र.-०२०२६१२३३७० | E-mail id :- gbpune2016@gmail.com |
|---|---|


क्र/सेतू/५४६/२०२५/ E.No.: पुणे दि.२०/०८/२०२५

प्रति,
विभागीय सह संचालक
(उच्च शिक्षण) पुणे विभाग,पुणे.

**विषय:-पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयात आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे बाबत...**

संदर्भ:सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७२४/प्र.क्र.४५/मावतं/ दि.२०/०८/२०२४.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या CSC २.० योजनेंतर्गत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणे बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेत आलेल्या असून,सदर आपले सरकार सेवा केंद्राचे स्थापन,संनियंत्रण व प्रशासकीय नियंत्रण जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविले आहे.सदर शासन निर्णयात नमूद केलेनुसार ज्या महाविद्यालयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे बाबतची मागणी करण्यात येईल,त्या महाविद्यालयांना सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि.१९/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करणेस मान्यता देणेत आली आहे.

त्या अनुषंगाने महाविद्यालयांत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे मार्गदर्शनपर कार्यशाळा दि.२९/०८/२०२५ रोजी आयोजित करणेत येणार आहे.तरी आपणास याद्वारे कळविणेत येते की,आपल्या अधिनस्त सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सदर कार्यशाळेस उपस्थित राहणेकामी आपले स्तरावरून सूचित करावे.तसेच सदर कार्यशाळेचे नियोजन करणेकामी दि.२६/०८/२०२५ रोजी ११:०० वाजता या कार्यालयात बैठकीसाठी उपस्थित राहावे.

(ज्योती कदम)
निवासी उपजिल्हाधिकारी,पुणे.

राज्यातील महाविद्यालयांत आपले सरकार
सेवा केंद्र सुरु करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान)**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७२४/प्र.क्र.४५/मावतं**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
दिनांक - २० ऑगस्ट, २०२४.

**संदर्भ :** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.१९.०१.२०१८
२) शासनाचे समक्रमांकाचे दि.३१.०७.२०२४ रोजीचे पत्र.

<u>प्रस्तावना</u> :-

उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या CSC २.० योजनेंतर्गत आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून, सदर आपले सरकार सेवा केंद्राचे स्थापन, सनियंत्रण व प्रशासकीय नियंत्रण जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविले आहे. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दाखले सुलभतेने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये अहमदनगर जिल्ह्यातील १० तालुक्यामधील १५ महाविद्यालयांत प्रायोगिक तत्वावर आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

शासनाचा सदर निर्णय हा राज्यामध्ये अतिशय लोकप्रिय झालेला असून, अशा प्रकारे महाविद्यालयांत आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबत राज्यातील इतर ठिकाणांवरुनही मागणी असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव, सदर निर्णय राज्यभर लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

राज्यातील ज्या ज्या महाविद्यालयांकडून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी करण्यात येईल, त्या त्या महाविद्यालयांना उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१९.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीस अनुसरुन आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाविद्यालयातील आपले सरकार सेवा केंद्रास मंजूरी देतांना संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या सल्ल्याने आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच सदरील कार्यवाही करतांना महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्या. (महाआयटी), मुंबई यांचेशी तांत्रिक सहाय्याकरीता समन्वय साधावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४०८२०१२०४३१८६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUDAM EKNATH
ANDHALE

Digitally signed by SUDAM EKNATH ANDHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=SUDAM EKNATH ANDHALE
Date: 2024.08.20 12:19:29 +05'30'

(सुदाम आंधळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव